# विस्थापनाचा असाही प्रश्न

**चंद्रशेखर पुरंदरे**

एखाद्या देशात गुन्हेगारी व तज्जन्य सामाजिक अशांतता टोकाला गेल्यास लहान मुले त्याचे बळी कशी पडतात याचे उदाहरण मध्य अमेरिका उपखंडात दिसत आहे.

अमेरिका देशाच्या दक्षिण सीमेला लागून मेक्सिको हा देश आहे. त्याच्या दक्षिणेला हा भूभाग येतो. होंडुरास, ग्वाटेमाला, अल् साल्वाडोर, निकारागुआ, बेलिझी वगैरे देश यात आहेत. यातील पहिले तीन देश व अमेरिका देश यांच्यात लहान मुलांच्या अमेरिका देशात शिरण्याचा प्रश्न आता गंभीर होऊ लागलेला आहे.

हे देश लहान आहेत, गरीब आहेत. तेथे अंमली पदार्थांचा वापर व व्यापार प्रचंड आहे. सामान्य गुन्हेगारीबरोबरच या व्यापाराशी निगडित गुन्हेगारीने सामाजिक अशांतता आहे. (या व्यापारात देशाचा राष्ट्रीय उत्पन्नाइतका पैसा गुंतला असल्याचा अंदाज आहे.) उदाहरणार्थ, अमेरिकेत खुनांचे प्रमाण एक लाख लोकसंख्येत पाचहून कमी आहे. मेक्सिकोत ते २०च्या आसपास, अल् साल्वाडोरमध्ये ६०-७० च्या दरम्यान तर होंडुरासमध्ये जगात सगळ्यात जास्त म्हणजे ८०-९० आहे. तेथील पाचातील चार खुनांचा पोलीस तपासच करत नाहीत. नागरिकही स्वत:हून पोलिसांकडे तक्रार करत नाहीत. कारण पोलीस ज्या गँगसाठी काम करतात त्या गँगने बहुधा खून केलेला असतो. मग सूड म्हणून तक्रार करणाऱ्या नागरिकालाच पोलीस ठार मारतात.

आपले प्रभावक्षेत्र वाढवण्यासाठी अंमली पदार्थांचा व्यापार करणाऱ्या गँग्स् इतर प्रतिस्पर्धी गँग्सशी सतत सशस्त्र संघर्षात असतात. आपल्या गँगमध्ये काम करण्यासाठी नागरिकांना पळवणे, हाल करणे, नातेवाईकांना मारणे अशी दहशत बसवली जाते. आता लहान मुलेही या गँग्सचे भरतीसाठी लक्ष्य झाली आहेत. गँग्स् सामान्य कुटुंबांकडून संरक्षणासाठी पैसा उकळतात. मोठे उद्योग, लहान दुकानदार, फेरीवाले यांच्याकडूनही दरमहा खंडणी उकळली जाते. या देशांच्या अनेक शहरात सरकारी अंमल चालत नाही. तेथील नागरिक कायमच्या भीतीत जगतात. शहराचा कोणता भाग सध्या कोणत्या गँगच्या अंमलाखाली आहे हे माहीत असणे जिवंत राहण्यासाठी आवश्यक असते.

होंडुरासमधील एक-दोन प्रातिनिधिक घटनांवरून एकूण परिस्थितीचा अंदाज यावा. पाच वर्षांच्या एका मुलीच्या हातातून पाच डॉलर्सशी नोट हिसकावण्याचा प्रयत्न गुंडांनी केला. तिने विरोध केला. ते पाच डॉलर्स तर त्यांनी घेतलेच पण तिच्यावर बलात्कार करून तिचा जीवही घेतला. आणखी एका सात वर्षाच्या मुलाचा १३ वर्षांचा भाऊ अचानक गायब झाला. त्याला शोधायला हा मुलगा सायकलवरून निघाला. बरोबर त्याने एका मित्रालाही नेले. काही दिवसांनी त्यांचे मृतदेह सापडले. दोघांना डोक्यात गोळ्या घालून ठार करण्यात आले होते व एकाला हालहाल करून ठार करण्यात आले होते. अशा सभोवालच्या वातावरणात १०-१२ वर्षांची मुलेही देश सोडायला प्रवृत्त होतात. त्यांच्यापुढे तीनच पर्याय असतात. एक तर गँगमध्ये सामील होणे व इतरांना मारणे किंवा या तीन मुलांनी केले तसे गँगमध्ये जायला नकार देणे व स्वत:चा मृत्यू ओढवून घेणे किंवा देश सोडणे.

हे हिंसक वातावरण हा एक घटक झाला. दुसरा घटक या वातावरणाचा व्यापारी फायदा घेतो. तो म्हणजे अपप्रचार. मुलांना अमेरिकेत नेणे हा मोठा धंदा झाला आहे. त्यातही देशाच्या उत्पन्नाएवढा पैसा गुंतलेला आहे. या मानवी वाहतूक करणाऱ्या गँग्स सरकारी नियंत्रणाखाली नाहीत. अमेरिकेत प्रौढ बरोबर नसलेल्या मुलांचे जाणे सोपे असते हा तो अपप्रचार. यांच्यासाठी अमेरिकेचे नियम शिथिल असतात आणि त्यांना नागरिकत्वही सहज मिळते असे या प्रचारात सांगितले जाते. त्याला अनेक पालक भुलतात व मुलांना पाठवतात. दरडोई सुमारे २००० ते ५००० डॉलर्स एवढी फी हे स्मगलर्स वसूल करतात. होंडुरास, ग्वाटेमाला व अल् साल्वाडोर या कोणताही देशातून भूमार्गाने अमेरिकेच्या सीमेपर्यंत पोचायला सुमारे १५०० ते २००० किलोमीटर्सचा खडतर प्रवास असतो. तो मार्ग संपूर्ण मेक्सिको देशातून जातो. हा प्रवास कधी अधिकृतपणे पण बहुधा अनधिकृतरीत्या होतो. अशा मुलांनी भरलेल्या बसेस मागून बसेस या देशांतून रवाना होतात. त्या थेटही जातात किंवा मध्ये मालगाड्यांवर बसून प्रवास होतो. शेवटचा टप्पा बहुधा बोटीने पार पडतो.

उपासमार, रोगराई, अत्याचार, मारहाण अशा सगळ्या क्लेशांना मुले सामोरी जातात. अनेक मुले मेक्सिकोत वेठबिगारीत अडकतात. बऱ्याचजणांना मेक्सिकोतून परत मायदेशी पाठवले जाते. मग परत त्याच तिकीटावर तोच खेळ सुरू होतो. अमेरिकेत जाण्याचा दहा-दहा वेळा प्रयत्न केल्याची उदाहरणे आहेत. त्यावरून आपल्या देशात रहायला नको ही अगतिकता काय पातळीवर गेली आहे याचा अंदाज येतो. बऱ्याच कुटुंबातील आई किंवा बाबा आधी एकेकटे अमेरिकेला जातात. मुले नंतर जातात.

अशा कायदेशीर आणि शक्य मार्गातही अमेरिकन नोकरशाही दिरंगाई करते. मुलांसाठी दहा-दहा वर्षे वाट बघायला लागल्याच्या घटना घडलेल्या आहेत. एवढ्या सव्यापसव्यानंतर अमेरिकेची सीमा पार केल्यावर ती तेथील नोकरशाहीच्या कचाट्यात अडकतात.

**पार्श्वभूमी**

या देशांची परिस्थिती पूर्वी इतकी वाईट नव्हती. गेल्या ४०-५० वर्षांतील अंमली पदार्थांच्या वाढत्या व्यापाराने ती खालावली. मध्य अमेरिका व मेक्सिको हे अमेरिका देशाला होणाऱ्या वाहतुकीचे मार्ग आहेत. कोकेन हे अमेरिकेत जास्त खपणारे द्रव्य कोलंबिया-बोलिव्हिया या दक्षिण अमेरिका खंडातील इतर देशांत बनते. ते समुद्रमार्गे मध्य अमेरिकेत येते व तेथून भूभागाने अमेरिकेत जाते. अमेरिकेत येणारे ९०% कोकेन असे येते. ते बनवणाऱ्या गँग्स कोलंबियात तर वाहतूक करणाऱ्या गँग्स मेक्सिकोत आहेत. त्यांच्या शाखा या देशात आहेत, वर म्हटल्याप्रमाणे नफा वाढवण्यासाठी दुसऱ्या गँगचा इलाखा बळकावण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो व त्यातून हिंसक घटना घडतात. या गँग्सनी पोलीस खाते, लष्कर व राजकारणी भ्रष्ट केलेले आहेत त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण नाही.

कोकेनच्या व्यापाराआधी अमेरिकेच्या सततच्या ढवळाढवळीने या देशांची अंतर्गत समाजव्यवस्था खिळखिळी झाली. गेल्या शंभर वर्षांपासून आजतागायत हे हस्तक्षेप चालू आहेत. तत्कालीन कारणे त्या-त्या देशात निरनिराळी असतील पण त्यात साम्राज्यवाद हा समान धागा आहे. आर्थिक शोषण व त्यामागे लष्करी बडगा हे अमेरिकन वसाहतवादाचे तंत्र जगभर आहे, तेच मध्य अमेरिकेतही. सुरुवात या देशातील प्रचंड नैसर्गिक संपत्ती लुटण्याने झाली (ग्वाटेमाला - भाज्या व फळफळावळ, अल् साल्वाडोर १९८७ पर्यंत कॉफी). या देशातील उत्पादन आहे तसे अमेरिकन बाजारपेठेत नेण्यास आधी सुरुवात झाली. मग त्यावर प्रक्रिया करून ते अमेरिकन व इतर बाजारपेठात नेण्याचा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उद्योग सुरू झाला. त्या अनुषंगाने त्या-त्या देशातील पिकांचे वैविध्य संपवून एकाच प्रकारची पिके लावणे, अल्पभूधारकांची जमीन साम-दाम-दंड-भेद या ना त्या मार्गाने बळकावणे, त्यासाठी दंडेलशाही व तिच्या कामासाठी स्थानिक सरकार विकत घेणे हे प्रकार सुरू झाले. लोकांच्या हक्कांना प्राधान्य देण्याचा, विस्थापितांना न्याय देण्याचा प्रयत्न काही वेळा प्रत्येक देशात निर्वाचित सरकारांनी केला. ते सरकार अमेरिकेच्या दृष्टीने 'डावे' ठरले. शेजारच्या क्युबाच्या कम्युनिस्ट प्रभावाखाली अशी सरकारे आहेत असा अमेरिकन जनमानसाला आवडता शत्रू निर्माण करण्यात आला. मग लष्कराला चिथावणी देऊन लष्करशाही आणणे, अंतर्गत यादवी माजवणे असे प्रकार करण्यात आले. त्यामुळे अल्पभूधारकाला सुरक्षा, त्यांच्या उत्पादनाला सबसिडी, मोठ्या जमीनदारांच्या जमिनींचे राष्ट्रीयीकरण व जमिनींचे पुनर्वाटप ही धोरणे कागदावरच राहिली. जनहित साधणे हा अमेरिकेने आणलेल्या सरकारचा उद्देश राहिला नाही. राहिले ते अमेरिकेचे आर्थिक हितसंबंध व ते राखण्यासाठी अमेरिकेचे भूराजकीय प्रभुत्व. यामुळे सामाजिक सुरक्षा बिघडली, विषमता वाढली, दमनशाही वाढली आणि त्यात अंमली पदार्थांच्या व्यापाराचा शिरकाव झाला.

अंमली पदार्थ : सध्याचा सामान्य मतप्रवाह - विशेषत: अमेरिकन मतप्रवाह - असा आहे की लहान मुलांच्या स्थलांतरणाचा प्रश्न फक्त अंमली पदार्थांच्या व्यापारी गँग्सने निर्माण केला आहे. त्यांना अटकाव केला की प्रश्न आटोक्यात येईल. खरेतर या गँग्स काय किंवा मुलांचे स्थलांतरण काय हे मूळ प्रश्न नाहीत. ती लक्षणे आहेत. मूळ प्रश्न त्या-त्या देशातील सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा आहे. त्याकडे लक्ष न देता, सोयीच्या राजकारणासाठी लक्षणांचा गहजब केला जात आहे. मग ती सरकारे या गँग्सचा बंदोबस्त करायला असमर्थ असल्याने त्यांच्या पोलिसांना, लष्कराला प्रशिक्षण द्या, प्रसंगी प्रशिक्षित अमेरिकन विशिष्ट दले पाठवा असे कार्यक्रम पुढे येतात. या धोरणामागची भूमिका तपासण्यासारखी आहे. त्यासाठी अफगाणिस्तानचे उदाहरण घेऊ.

अफगाणिस्तान हा जगात अफूची सर्वात जास्त निर्मिती व निर्यात करणारा देश आहे. त्यावर प्रक्रिया होऊन मादक द्रव्ये युरोपात येतात. युरोपातील अफूची व्यसनाधीनता हा वस्तुत: युरोपचा प्रश्न आहे. अफूची अफगाणिस्तानातील लागवड बंद व्हावी यावर दुमत नाही पण समजा, जर्मनीत अफूचे व्यसनाधीन आहेत, म्हणून जर्मनी काही अफगाणिस्तानातील अफूच्या शेतांवर बॉम्बहल्ला करत नाही. अमेरिका हे करू पाहते. 'आमच्या देशातील वाढती व्यसनाधीनता हा तुमच्या देशातील उत्पादनाचा परिणाम आहे' ही अमेरिकेची भूमिका आहे. त्यामागे आर्थिक कारणे आहेत. विकसित देशात व्यसनाधिनतेला आळा घालणे हा महागडा कार्यक्रम आहे. त्यासाठी पोलीस, इस्पितळे, विशेष वैद्यकीय उपचार यंत्रणा यावर प्रचंड खर्च करावा लागेल. परत आपल्या सीमा या द्रव्यांची वाहतूक होऊ नये म्हणून कडेकोट बंदिस्त कराव्या लागतील. त्यापेक्षा अशा दुबळ्या देशातील हस्तक्षेप स्वस्त आहे. या हस्तक्षेपाचा दुसरा फायदा म्हणजे आपले आर्थिक-भूराजकीय हितसंबंध शाबूत राहतात व अधिक मजबूत होतात. म्हणून अमेरिका ही ढवळाढवळ करते. म्हणजे हा साम्राज्यवाद आहे. या धोरणामुळे आजवर या अंमली पदार्थांचा प्रश्न सुटलेला नाही, तरी वाटचाल तशीच चालू दिसते.

या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे. परत अफगाणिस्तानचे

उदाहरण घेतल्यास, तिथल्या शेतकऱ्याला या लागवडीपासून परावृत्त करायला अफूपेक्षा जास्त मिळकत देईल असा पर्याय द्यायला हवा. कांदे-बटाटे लावून जर अफूच्या अल्पांशाने मिळकत होत असेल तर शेतकरी कांद्या-बटाट्याकडे वळणार नाही आणि हा पर्याय अफगाणिस्तानच्या सरकारने द्यायला हवा. जर्मनी तो देऊ शकत नाही. म्हणजे अंमली पदार्थांची वाहतूक हा फक्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न राहत नाही. अमेरिका तो प्रश्न कायदा व सुव्यवस्थेचा आहे असे मानते.

**सद्य:स्थिती**

निदान आजच्या अमेरिकन विचारमंथनात ही जाणीव अस्पष्टपणे तरी येताना दिसते. त्या-त्या देशात वर उल्लेखलेल्या अपप्रचाराविरुद्ध अमेरिका प्रचार सुरू करत आहे. अमेरिकन उपाध्यक्ष जोई बायडेन यांच्या मते तीन प्रकारची उपाययोजना आवश्यक आहे. गँग्सच्या हिंसाचाराला आळा व सामाजिक सुरक्षेत वाढ, देशाच्या आर्थिक प्रगतीला मदत आणि अमेरिकेहून परत येणाऱ्या कुटुंबांना व मुलांना समाजात सामावून घेणे. यासाठी त्या-त्या देशाला अमेरिका 'मदत' करेल. ही 'मदत' म्हणजे काय हे वर पाहिले. मुले ज्या व्यवस्थेची बळी आहेत, ती व्यवस्था अमेरिका अधिक बळकट करणार हे उघड आहे. तरीही ही उपाययोजना अमेरिकेच्या अंतर्गत पक्षीय राजकारणामुळे व राजकीय नेत्यांच्या अदूरदर्शीपणामुळे आणि प्रश्नाच्या वाढीव प्रमाणाच्या दडपणाखाली दुर्लक्षिली जात आहे. ओबामाने सरकारकडे या प्रश्नावर उपाय काढण्यासाठी जास्तीच्या पैशाची मागणी केली आहे. या पैशातून जास्तीची गोदामे (मुलांना तात्पुरते ठेवण्यासाठी) बांधली जातील. नोकरशाहीत जास्तीचे न्यायाधीश व कर्मचारी भरले जातील पण प्रामुख्याने पैसा खर्च होईल तो हा ओघ अमेरिकेपर्यंत येणे थांबवण्यासाठी व आलेल्यांना परत पाठवण्यासाठी. या मुलांना परत पाठवणे म्हणजे त्यांना मृत्युदंड देणे आहे. ती आंतरराष्ट्रीय करारांनुसार मानवी हक्कांची तीव्र पायमल्ली आहे असे अनेक संघटना म्हणत असूनही ही परिस्थिती आहे.

त्यामागे खास अमेरिकन वृत्ती आहे. ती म्हणजे आपल्या प्रश्नाचा बागुलबुवा करणे. सीरियाच्या शेजारी देशांनी गेल्या दोन-तीन वर्षांत तीस लाखाहून अधिक निर्वासित आपल्या देशात सामावून घेतले. अमेरिकेत जूनमध्ये जास्तीत जास्त निर्वासित आले. ते ९००० होते. जॉर्डनने दोन दिवसांत एवढे सीरियन निर्वासित स्वीकारलेले आहेत, पण त्याचा गाजावाजा या प्रश्नाएवढाच काय, व्हावा तेवढाही होत नाही.

शब्दच्छल चालू आहे, तो यांना आर्थिक कारणांसाठी स्थलांतरित होणारे म्हणायचे का हिंसेमुळे स्थलांतरित होणारे म्हणायचे. त्या लेबलानुसार कायदा बदलतो. आर्थिक स्थलांतरितांसाठी अमेरिकेचा स्वत:चा किचकट कायदा लावला जातो तर हिंसेमुळे स्थलांतरित असतील, त्यांना मायदेशी परत गेल्यास जीविताचा धोका असेल, तर आंतरराष्ट्रीय कायदा लागू होतो व प्रवेशाची प्रक्रिया जरा सुलभ होते. उदाहरणार्थ, भारतातून अमेरिकेत नोकरीसाठी जाणारा सॉफ्टवेअर इंजिनियर कामाचे समाधान, व्यवस्था म्हणून काहीतरी यंत्रणा चालते व पैसा यासाठी जातो. या मुलांचे ते स्वप्नही नाही. ती देशातील परिस्थितीमुळे बाहेर ढकलली गेली आहेत. पण अमेरिकन कायदा हे स्वीकारायला तयार नाही.

दुसऱ्या दृष्टीने पाहता, ६०-७० हजार मुले हे अमेरिकेसारख्या संपन्न देशाला न झेपणारे आव्हान नाही. बांगलादेशाच्या निर्मितीवर १९७१ साली आपल्यासारख्या गरीब देशाने एक कोटीच्या आसपास निर्वासितांना येऊ दिले होते. त्यामुळे या प्रमाणावरचे निर्वासित परवडत नाहीत हा अमेरिकेचा दावा विश्वासार्ह नाही.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*